# जिल्हा उद्योग केंद्र, बीड
## दिनांक १७/०३/२०२३ रोजी मा. जिल्हाधिकारी, बीड यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या निर्यात प्रचालन समिती सभेचे इतिवृत्त.

दिनांक १७/०३/२०२३ रोजी दु. ४.०० वा. मा. जिल्हाधिकारी, बीड यांचे अध्यक्षते खाली निर्यात प्रचालन परिषद समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर सभेस उपस्थित अधिकारी / प्रतिनिधी यांची यादी सोबत जोडली आहे.

सर्वप्रथम महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, बीड यांनी सभेस उपस्थित असलेल्या सर्व अधिकारी व प्रतिनिधी यांचे स्वागत करुन मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने सभेस सुरुवात केली.

निर्यातीमध्ये भारत देशाचे स्थान अबाधीत ठेवण्यासाठी तसेच एक ट्रिलीयन डॉलर अर्थव्यवस्थेचे लक्ष्य साकारण्याच्या दृष्टीने देशाची व अर्थात राज्याची निर्यात वाढविणे हा प्रमुख हेतु आहे. महाराष्ट्र राज्य निर्यातीच्या बाबतीत देशातील अग्रगण्य क्रं. ०२ चे राज्य असुन (क्रं ०१ गुजरात) एकूण निर्यातीच्या २२ टक्के महाराष्ट्राचा वाटा आहे त्यापैकी बीड जिल्ह्यातुन विविध उत्पादनां अंतर्गत मार्च-२०२२ अखेर रु.६१२.५६ करोडची निर्यात झाली असुन **बीड जिल्ह्याची महाराष्ट्र अंतर्गत टक्केवारी ही ०.११ टक्के आहे**. त्यामध्ये मुख्य उत्पादने पुढील प्रमाणे **केन शुगर, इंडियन कॉटन, रिफाईन्ड शुगर, केन मोलेसेस, कॉटन यार्न, ऑईल केक व कांदा** या उत्पादनांची निर्यात केली जाते. सदरील उत्पादनांची निर्यात ही प्रामुख्याने इन्डोनेशिया, बांगलादेश, मलेशीया, चीन, पाकिस्तान, थायलंड, श्रीलंका, युअेई, या देशांमध्ये केली जाते.

बीड जिल्ह्यातुन ODOP साठी 1. Beed Custard Apple (Agri.) 2. Cotton Bales & Cotton Seed Oil (Industrial) दोन उत्पादने निश्चित करण्यात आलेली आहे. जिल्ह्यामध्ये Beed Custard Apple (Agri.) चे प्रक्रिया उद्योग नसल्यामुळे शेतकरी व्यापा-यांना माल विकतात व व्यापारी मुंबई किंवा कोलकत्ता येथुन मालाची निर्यात करतात. **Cotton Bales & Cotton Seed Oil (Industrial) चे उत्पादन जवळपास ०८ ते १० लाख बेल्सपर्यंत नैसर्गिकरित्या दर्जेदार / गुणवत्तापुर्ण होते.**

यावर मा. अध्यक्ष यांनी जिल्ह्यात निर्यात वाढीला चालना मिळावी या संदर्भात मार्गदर्शक सुचना खालील प्रमाणे दिल्या.

१. बीड जिल्ह्यातुन ODOP म्हणुन कृषी उत्पादना (GI) साठी सिताफळ या फळाची निवड केलेली आहे. परंतु सदरील सिताफळांची निर्यात ही इतर जिल्ह्यातील मर्चंन्ट एक्सपोर्टर व्दारे केली जाते त्यामुळे सदरील एक्सपोर्टचा जिल्ह्याच्या एक्सपोर्टमध्ये समावेश होत नाही. त्यासाठी मा. अध्यक्षांनी जिल्ह्यातील शेतक-यांच्या उत्पादनाची नोंदणी ही एपिएमसीमध्ये करुन त्यानंतर तो एक्सपोर्ट मर्चंन्टव्दारे एक्सपोर्ट करावा अशा सुचना दिल्या. असे केल्याने जिल्ह्यातुन जाणा-या सिताफळ एक्सपोर्टची नोंद ही एपिएमसीकडे राहील व तो जिल्ह्याच्या एक्सपोर्टमध्ये समावेश होईल त्यासाठी मा. जिल्हाधिकारी यांनी जिल्ह्यातील सर्व एपिएमसी यांची बैठक तातडीने घेण्यात येईल असे सुचविले.



Scanned with CamScanner

२. औद्योगिक संघटनांनी जिल्ह्यातुन निर्यात करण्यासाठी येणा-या अडचणीचे सुतोवाच पुढीलप्रमाणे केले.

- बँकाकडुन लेटर ऑफ क्रेडिटसाठी (LC) प्रतिसाद मिळत नाही.
- कॉटनची स्टेपल लेंग्थ, आर.डी. Value साठी अधुनिक प्रयोग शाळा शासना मार्फत व्हावी.
- बीड जिल्हा Non Development Industrial D+ Zone मध्ये असल्याने अतिरिक्त सामुहिक प्रोत्साहने मिळावित जेणे करुन उद्योजक निर्यातिसाठी प्रेरित होतील.
- रेल्वे नसल्याने दळणवळणासाठी अतिरीक्त खर्च होतो.

सर्वात शेवटी महाव्यवस्थापक यांनी सर्व उपस्थित अधिकारी यांचे आभार मानले व सभा संपल्याचे घोषित केले.

**महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव,**
**जिल्हा निर्यात प्रचालन समिती, बीड**

**मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा निर्यात प्रचालन समिती,**
**जिल्हा बीड**



Scanned with CamScanner